नि.दि.दा.क्र. २२८/२०२०
शेख फतरु वि. इंदुबाई व वगैरे

**आदेश नि. क्र. १७ खाली**
दिनांक ११.०७.२०२३

अर्जदार / वादी यांनी अर्ज **निशाणी १७** हा मयत वादी यांचे वारस अभिलेखावर घेण्याकरीता दाखल केला आहे.

२. अर्जदारातर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, वादी शेख फतरु पिता शेख महंमद **दि. २५.०२.२०२१** रोजी मयत झाले आहेत. वादी यांची पत्नी हयात नाही. वादीचा मुलगा शेख गफार शेख फतरु हा देखील हयात नाही. वादी शेख फतरु यांच्या मुलाचा मुलगा हा मुस्लीम पर्सनल लॉ प्रमाणे एकमेव वारस आहे. प्रस्तुतचा दावा मनाई हुकूम मिळणे करिता असुन वादीचे वारस शेख मुस्तफा पि. शेख गफार यांना मयत वादीच्या जागी सामील करुन घेण्याची विनंती केली.

३. प्रतिवादी क्र. १ व २ यांना पुरेशी संधी देवुन सदर अर्जावर म्हणणे व युक्तीवाद केला नाही. त्यामुळे सदरील अर्ज त्यांच्या म्हणणे व युक्तीवाद पुढे चालविण्याचा आदेश पारीत झालेला आहे. दिनांक २४.०२.२०२३ रोजी वादी याने निशाणी १७ वर युक्तीवाद केला. त्यानंतर प्रतिवादी यांना पुरेशी संधी देउन देखील त्यांनी युक्तीवाद केला नाही. आज रोजी प्रतिवादी व त्यांचे विधीज्ञ वारंवार पुकारा करुन देखील ४.३० पर्यंत गैरहजर. त्यामुळे प्रकरण आदेशाकरता हाती घेण्यात येते.

४. न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले, त्याच प्रमाणे वादी तर्फे करण्यात आलेला युक्तीवाद विचारात घेण्यात आला. न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता वादी शेख फतरु पिता शेख महंमद हे **दि. २५.०२.२०२१** रोजी मयत झाले असल्याचे दस्ताऐवज यादी **निशाणी १९ वरील अनु क्र. १** वरील मृत्यूप्रमाणपत्रावरुन दिसून येते. प्रस्तुत प्रकरण हे

मालकी हक्क घोषीत करुन ताब्यास हरकत अडथळा करु नये असा कायम मनाई हुकुम मिळण्याकरीता दाखल केले असल्याचे दिसून येते. वादी यांचे वारस शेख मुस्तफा पि. शेख गफार यांना वारस म्हणुन दाव्यात सामील करुन घेण्यास प्रतिवादींना कोणतीही हरकत नसल्याचे दिसून येते. त्यामुळे अर्जातील कारणे विचारात घेता प्रकरणाची संख्या टाळण्याकरीता व सदर प्रकरण निकाली काढण्याकरीता अर्जदारांना मयत वादी यांचे वारस न्यायालयीन अभिलेखावर घेणे आवश्यक असल्याचे दिसून येते. करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**<u>आ दे श</u>**

१. अर्ज अनुक्रमे निशाणी १७ हा मंजूर करण्यात येतो.

२. मयत वादीचे वारस न्यायालयीन अभिलेखावर घेवून त्याप्रमाणे दुरुस्ती करावी.

३. खर्च काही नाही.

BALAVIR NARAYAN GODBOLE

Digitally signed by BALAVIR NARAYAN GODBOLE
Date: 2023.07.12 10:46:26 +0530

दिनांक : ११—०७—२०२३

**( बा. ना. गोडबोले )**
४थे सहदिवाणी न्यायाधीश,क.स्तर,
अंबाजोगाई.